Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक जन सत्याचे प्राईम्स सम्राट टाईम्स
मुख्य संपादकः मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। शुक्रवार, दि. १७ जूलै २०२६ । वर्ष १ । अंक ९१ । पाने २ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

गोलाणी मार्केटच्या 'सी' विंगमध्ये आरोग्य धोक्यात;

(पान २ वर)



## Selected

### एमआयडीसीतील गोदामावर छापा; १२.१५ लाखांचा गुटखा जप्त

**जळगाव :** जळगाव एमआयडीसी परिसरातील एका गोदामावर अन्न व औषध प्रशासन विभागाने धाड टाकून तब्बल १२ लाख १५ हजार रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा जप्त केला. १४ जुलै रोजी करण्यात आलेल्या या कारवाईनंतर वकार शेख जब्बार शेख (वय ३२) आणि धीरज मिश्रा (दोघे रा. शाहूनगर) यांच्याविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोदामातून ४,८०० पाकिटे जप्त सहआयुक्त (अन्न) दिनानाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी किशोर साळुंके आणि आकाश बोराडे यांनी एम-१२४ सेक्टरमधील गोदामाची तपासणी केली. तपासणीदरम्यान गोवा गुटख्याची एकूण ४,८०० पाकिटे आढळून आली. यामध्ये प्रत्येकी ७५ पाऊच असलेली ३,३०० पाकिटे आणि २६ पाऊच १,५०० पाकिटे असा मोठा साठा जप्त करण्यात आला.

## वांगचुक यांच्या आंदोलनाला प्रकाश आंबेडकरांचा जाहीर पाठिंबा; 'सरकारने संवाद साधावा'

# वांगचुकांच्या आंदोलनाला राजकीय पाठिंबा वाढला

### उपोषणाच्या १९व्या दिवशी दिल्लीत भेट • लोकशाही मूल्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली । राजधानी दिल्लीतील आंदोलनस्थळी उपोषणाला बसलेल्या सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षण सुधारक सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला आता विविध राजकीय पक्षांकडून पाठिंबा मिळू लागला आहे.**



वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी मंगळवारी आंदोलनस्थळी जाऊन सोनम वांगचुक यांची भेट घेत त्यांना जाहीर पाठिंबा दिला. यावेळी त्यांनी केंद्र सरकारने आंदोलनकर्त्यांशी तातडीने संवाद साधावा, अशी मागणी करत सरकारच्या भूमिकेवर कठोर टीका केली. सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा मंगळवारी १९ वा दिवस होता. त्यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त होत असतानाच प्रकाश आंबेडकर यांनी त्यांची भेट घेऊन आंदोलनाला नैतिक पाठिंबा दर्शविला. भेटीनंतर त्यांनी सोशल मीडियावर भूमिका मांडत, "भाजप सरकारने सोनम वांगचुक यांच्याशी तातडीने संवाद सुरू करावा. संवाद साधण्याची सरकारची कोणतीही इच्छा दिसत नाही. संवाद हा केवळ राजकीय पर्याय नसून तो सरकारची घटनात्मक जबाबदारी आणि नैतिक कर्तव्य आहे," असे स्पष्ट मत व्यक्त केले. आंबेडकर यांनी पुढे म्हटले की, सोनम वांगचुक हे केवळ आंदोलनकर्ते नसून एक नाविन्यपूर्ण संशोधक, शिक्षण सुधारक आणि पर्यावरण विषयावर कार्य करणारे व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांच्या कार्याची देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेत अनेक पुरस्कारांनी त्यांचा गौरव करण्यात आला आहे. अशा व्यक्तीचा आवाज सरकार ऐकण्यासही तयार नसल्यास, देशातील लोकशाही आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याबाबत गंभीर प्रश्न निर्माण होतात, असे त्यांनी नमूद केले. सरकारने मतभेदांना शत्रुत्व न समजता लोकशाहीच्या चौकटीत संवादाचा मार्ग स्वीकारला पाहिजे, असेही त्यांनी अधोरेखित केले. आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करण्याऐवजी त्यांच्या भावना समजून घेत सकारात्मक तोडगा काढणे ही सत्ताधाऱ्यांची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी प्रकाश आंबेडकर यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या भूमिकेवरही भाष्य केले. त्यांनी म्हटले की, देशातील महत्त्वाच्या प्रश्नांवर आंदोलन करणाऱ्यांच्या पाठीशी विरोधी पक्षांनीही प्रत्यक्ष उभे राहणे आवश्यक आहे.

### आंदोलनाकडे देशभराचे लक्ष

धर्मेंद्र प्रधान यांच्यावर नीट पेपर लीक प्रकरणी राजकीय जबाबदारी निश्चित करण्याची मागणी ज्या पद्धतीने करण्यात आली, त्याचप्रमाणे विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी यांचीही लोकशाही लढ्यांना पाठिंबा देण्याची जबाबदारी असल्याचे आंबेडकर यांनी सांगितले. दरम्यान, सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला विविध सामाजिक संघटना, विद्यार्थी आणि काही राजकीय नेत्यांचा पाठिंबा वाढत असल्याने या आंदोलनाकडे देशभराचे लक्ष लागले आहे. केंद्र सरकारची पुढील भूमिका काय असेल आणि आंदोलनकर्त्यांशी संवादाची प्रक्रिया सुरू होणार का, याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली आहे.

---

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## बहिणींना दिलासा! जूनचा हप्ता खात्यात जमा होण्यास सुरुवात

### लाभार्थींना बँक खाते तपासण्याचे आवाहन




**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव | प्रतिनिधी:** राज्य शासनाच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत जून महिन्याचा ₹१,५०० रुपयांचा हप्ता पात्र महिलांच्या बँक खात्यावर जमा होण्यास सुरुवात झाली आहे. राज्यभरातील लाखो लाभार्थी महिलांच्या खात्यावर थेट डीबीटी (DIRECT BENEFIT TRANSFER) प्रणालीद्वारे निधी वर्ग केला जात असून महिलांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. शासनाच्या माहितीनुसार, सर्व पात्र लाभार्थींच्या खात्यावर रक्कम एकाच वेळी जमा होणार नसून ती टप्प्याटप्प्याने वर्ग केली जात आहे. त्यामुळे काही महिलांच्या खात्यावर हप्ता जमा होण्यासाठी आणखी २४ ते ४८ तासांचा कालावधी लागू शकतो. ज्या महिलांचे अर्ज मंजूर झाले आहेत, मात्र अद्याप खात्यावर पैसे जमा झाले नाहीत, त्यांनी काळजी करू नये. निधी हस्तांतरणाची प्रक्रिया सुरू असून लवकरच संबंधित लाभार्थींच्या खात्यावर रक्कम जमा होणार आहे. खाते तपासण्याचे आवाहन लाभार्थींनी आपल्या बँक खात्याशी संलग्न मोबाईल क्रमांकावर आलेले संदेश तपासावेत. राज्य शासनाच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत जून महिन्याचा ₹१,५०० रुपयांचा हप्ता पात्र महिलांच्या बँक खात्यावर जमा होण्यास सुरुवात झाली आहे. तसेच बँकेचे अधिकृत मोबाईल ॲप, पासबुक अपडेट किंवा यूपीआय ॲपच्या माध्यमातूनही खात्यात रक्कम जमा झाली आहे की नाही, याची खात्री करता येणार आहे. योजनेचा लाभ सुरळीत मिळण्यासाठी लाभार्थींचे बँक खाते आधारशी संलग्नअसणे आणि डीबीटी सुविधा सुरू असणे आवश्यक आहे. ज्या महिलांचे खाते अद्याप आधारशी लिंक झालेले नाही, त्यांनी तातडीने संबंधित बँकेत जाऊन प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे

## राष्ट्रवादी (शरद पवार) महिला पदाधिकाऱ्याला फेसबुकवरून जीवे मारण्याची धमकी; गृहराज्यमंत्री व पोलीस महासंचालकांकडे तक्रार

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई| प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या महिला काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीस तथा सामाजिक कार्यकर्त्या उषाताई चौधरी यांना फेसबुकच्या माध्यमातून जीवे मारण्याची गंभीर धमकी देण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी संबंधित व्यक्तीविरुद्ध तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम आणि पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्याकडे करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, महायुती आणि विशेषतः भाजपविरोधात लोकशाही मार्गाने भूमिका मांडणाऱ्या उषाताई चौधरी यांना फेसबुकवरून "घर पर चाय-नाश्ता करने १० लोगों को भेजता हूँ" असा धमकीचा संदेश पाठविण्यात आला.

या संदेशानंतर त्यांनी संबंधित प्रकरणाची गंभीर दखल घेऊन दोषी व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे. या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनीही नागपूर पोलिसांकडे पत्र पाठवून तातडीने चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची सूचना केली आहे. लोकशाही मार्गाने मत व्यक्त करणाऱ्या महिला पदाधिकाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पुढील चौकशीनंतर अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे.




राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या महिला काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीस तथा सामाजिक कार्यकर्त्या उषाताई चौधरी यांना फेसबुकच्या माध्यमातून जीवे मारण्याची गंभीर धमकी देण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी संबंधित व्यक्तीविरुद्ध तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम आणि पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्याकडे करण्यात आली आहे.

## सरकारी नोकरीच्या आमिषाने ५५.५० लाखांची फसवणूक!

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव| प्रतिनिधी:|** शासकीय नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत जळगावातील दोन तरुणांची तब्बल ५५ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी आणखी दोन आरोपींना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्यांची नावे संदेश शिरसाट (रा. कल्याण) आणि गोविंद स्वार (रा. बदलापूर) अशी आहेत. या प्रकरणात हॉटेल व्यावसायिक कुणाल रवींद्र नाईक (वय ३९, रा. नेताजी चौक, मेहरुण) यांनी आपल्या भावाला शासकीय नोकरी मिळवून देण्याच्या बहाण्याने मोठी रक्कम उकळल्याची तक्रार एमआयडीसी पोलिस ठाण्यात दाखल केली होती. या गुन्ह्यात यापूर्वीच दोन आरोपींना अटक करण्यात आली होती. पोलिस तपासादरम्यान संदेश शिरसाट आणि गोविंद स्वार यांचा या फसवणूक प्रकरणात सहभाग उघडकीस आला.

## जुन्या वादातून घरात घुसून मारहाण; महिलेशी गैरवर्तन!


**जन सम्राट टाईम्स**

**बोदवड | प्रतिनिधी :** बोदवड तालुक्यातील एणगाव येथे जुन्या वादातून एका महिलेच्या घरात घुसून मारहाण केल्याची घटना घडली आहे. यावेळी महिलेबरोबर गैरवर्तन तसेच तिच्या पती व सासूला मारहाण करून दुखापत केल्याच्या तक्रारीवरून सहा जणांविरुद्ध बोदवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ जुलै रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास ही घटना घडली. फिर्यादी महिलेच्या तक्रारीनुसार, संशयित सहा जणांनी जुन्या वादाच्या कारणावरून तिच्या घरात जबरदस्तीने प्रवेश केला.
यावेळी त्यांनी शिवीगाळ करत वाद घातला. त्यानंतर एका संशयिताने महिलेचा हात पकडून तिच्याशी गैरवर्तन केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तसेच महिलेच्या पतीला मारहाण करून दुखापत करण्यात आली असून, तिच्या सासूलाही मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. संशयितांनी लाकडी दांडक्याने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

## शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेली धानोऱ्यातील 'येवलेंची गढी'; इतिहासाचा जिवंत साक्षीदार!

**जन सम्राट टाईम्स**

**भुसावळ | प्रतिनिधी :** अजिंठा डोंगररांगांच्या कुशीत आणि काटेपूर्णा नदीच्या तीरावर वसलेले धानोरा हे अकोला जिल्ह्यातील बार्शीटाकळी तालुक्यातील ऐतिहासिक गाव छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शामुळे विशेष ओळखले जाते. अकोल्यापासून सुमारे ३८ किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावातील 'येवलेंची गढी' इतिहासप्रेमी आणि शिवभक्तांसाठी प्रेरणास्थान ठरत आहे. इतिहासातील उल्लेखानुसार, सन १६७० मध्ये छत्रपती शिवाजी महाराज कारंजा (लाड) येथील मोहिम यशस्वी




करून परतत असताना शत्रूला चकवा देण्यासाठी दुर्गम मार्गाने प्रवास करत होते. यावेळी सैन्यातील एक महत्त्वाचा घोडा जखमी झाला. हा घोडा अत्यंत विश्वासू असल्याने त्याच्या उपचारासाठी महाराजांनी धानोरा गावातील प्रसिद्ध वैद्य दामाजी पाटील येवले यांची मदत घेतली. दामाजी पाटील हे केवळ माणसांवरच नव्हे तर पशू-पक्ष्यांवरही उपचार करणारे नामवंत वैद्य होते. शिवरायांच्या गुप्तहेर यंत्रणेला त्यांच्या कौशल्याची माहिती असल्याने महाराजांनी आपला मार्ग बदलून येवलेंच्या गढीवर भेट दिली. येथे जखमी घोड्यावर उपचार झाल्यानंतर महाराज पुढील मोहिमेसाठी रवाना झाल्याची ऐतिहासिक परंपरा सांगितली जाते. या परिसराला ऐतिहासिक आणि पौराणिक वारशाची जोड लाभली आहे. गढीपासून अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या पांडव लेणी या महाभारतकालीन स्थळाशी संबंधित असल्याची स्थानिक परंपरा आहे. वनवासाच्या काळात पांडव येथे काही काळ वास्तव्यास होते, असा उल्लेख काही ऐतिहासिक संदर्भांमध्ये आढळतो. आज 'येवलेंची गढी' भग्नावस्थेत असली तरी तिचे उरलेले अवशेष तत्कालीन वैभवाची साक्ष देतात. भव्य बांधकामशैली, ऐतिहासिक महत्त्व आणि शिवकालीन स्मृती जपणारी ही गढी संवर्धनाच्या प्रतीक्षेत असून इतिहासप्रेमींसाठी महत्त्वाचे पर्यटनस्थळ ठरू शकते.

---

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## इम्पिरियल इंटरनॅशनल स्कूलमध्ये इयत्ता दहावीसाठी 'ब्रेनमॅपिंग' सेशन

### विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक व संस्कारक्षम उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**जन सम्राट टाईम्स**

**पाळधी । प्रतिनिधी:** पाळधी येथील इम्पिरियल इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी VES DMIT अंतर्गत 'ब्रेनमॅपिंग' सेशन तसेच प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी 'यशोदा स्पर्श – कान्हाचे संस्कार' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दोन्ही उपक्रमांना विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या ब्रेनमॅपिंग सेशनमध्ये VES DMITचे संस्थापक डॉ. अजय दरेकर (मुंबई) यांनी विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमता,




शिकण्याची पद्धत, एकाग्रता, स्मरणशक्ती, व्यक्तिमत्त्व विकास आणि करिअर नियोजन याविषयी मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना स्वतःच्या क्षमता ओळखून अभ्यासाचे प्रभावी नियोजन करण्यासाठी उपयुक्त दिशा मिळाली. प्राथमिक विभागासाठी आयोजित 'यशोदा स्पर्श – कान्हाचे संस्कार' कार्यक्रमात डॉ. अजय दरेकर यांनी 'पालकत्व' या विषयावर मार्गदर्शन केले. भगवान श्रीकृष्ण यांच्या बालचरित्रातून यशोदा मातेने दिलेले प्रेम, सत्य, प्रामाणिकपणा, शिस्त, मैत्री आणि उत्तम संस्कार यांचे महत्त्व कथा, गीते, संवाद आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून पालकांना समजावून सांगितले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. याशिवाय उपस्थित माता-पालकांसाठी मनोरंजनात्मक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले. यावेळी शाळेचे चेअरमन इंजी. नरेश चौधरी, संचालक जी. डी. पाटील, विमल सोमण, प्राचार्य आर. एल. माळी, शारदा पाटील, भाग्यश्री आळंदे तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच उत्तम संस्कार आणि जीवनमूल्ये आत्मसात करण्याचे आवाहन केले. अशा नाविन्यपूर्ण आणि संस्कारक्षम उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा शाळेचा संकल्प अधिक दृढ होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

### करिअर नियोजन विषयी मार्गदर्शन

दोन्ही उपक्रमांना विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या ब्रेनमॅपिंग सेशनमध्ये VES DMITचे संस्थापक डॉ. अजय दरेकर (मुंबई) यांनी विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमता, शिकण्याची पद्धत, व्यक्तिमत्त्व विकास आणि करिअर नियोजन याविषयी मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना स्वतःच्या क्षमता ओळखून अभ्यासाचे प्रभावी नियोजन करण्यासाठी उपयुक्त दिशा मिळाली. प्राथमिक विभागासाठी आयोजित 'यशोदा स्पर्श – कान्हाचे संस्कार' कार्यक्रमात डॉ. अजय दरेकर यांनी 'पालकत्व' या विषयावर मार्गदर्शन केले. भगवान श्रीकृष्ण यांच्या बालचरित्रातून यशोदा मातेने दिलेले प्रेम, सत्य, प्रामाणिकपणा, शिस्त, मैत्री आणि उत्तम संस्कार यांचे महत्त्व कथा, गीते, संवाद आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून पालकांना समजावून सांगितले.

## सरस्वती स्कूलमध्ये विद्यार्थी पदग्रहण समारंभ!

### नवनियुक्त विद्यार्थी प्रतिनिधींचा शपथविधी



**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव | प्रतिनिधी :** लेवा एज्युकेशनल युनियन संचालित सरस्वती प्रायमरी इंग्लिश मीडियम स्कूल, एम.आय.डी.सी., जळगाव येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विद्यार्थी नेतृत्व मंडळाच्या (Student Council) पदग्रहण समारंभाचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, शिस्त आणि जबाबदारीची भावना विकसित व्हावी, या उद्देशाने हा सोहळा पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात सुश्राव्य स्वागतगीताने झाली. त्यानंतर लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या नवनियुक्त विद्यार्थी प्रतिनिधींना अधिकृत बॅज व स्कार्फ प्रदान करण्यात आले. सर्व पदाधिकाऱ्यांनी शाळेच्या नियमांचे पालन, कर्तव्यनिष्ठा आणि शिस्त राखण्याची सामूहिक शपथ घेतली. यावेळी लेवा एज्युकेशनल युनियनचे अध्यक्ष प्रज्ञावंत नंदकुमार गोपाळराव बेंडाळे यांनी नवनियुक्त प्रतिनिधींचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या. "पद हे केवळ अधिकाराचे नसून जबाबदारीचे प्रतीक आहे. विद्यार्थ्यांनी नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि सामाजिक उत्तरदायित्व जोपासून शाळेचे नाव उज्ज्वल करावे," असे मार्गदर्शन त्यांनी केले. या कार्यक्रमासाठी शाळेचे प्राचार्य डेविड दास यांचे मार्गदर्शन लाभले.

# प्रभाग 10 मधील जीर्ण मटण मार्केट तात्काळ स्थलांतरित करा : नगरसेवक गुलाबराव मराठे

## वैदू वाडा-कुंभार वाडा परिसरातील नागरिकांचा आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

जन सम्राट टाईम्स




**धरणगाव | प्रतिनिधी :** धरणगाव शहरातील प्रभाग क्रमांक १० मधील अनेक वर्षांपासून कार्यरत असलेले मटण मार्केट अत्यंत जीर्ण व धोकादायक अवस्थेत पोहोचले असून, या इमारतीमुळे व्यापारी, ग्राहक आणि परिसरातील नागरिकांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडण्यापूर्वी हे मटण मार्केट तात्काळ सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात यावे, अशी जोरदार मागणी नगरसेवक गुलाबराव मराठे यांनी अकोला महानगरपालिका प्रशासनाकडे केली आहे. नगरसेवक गुलाबराव मराठे यांनी सांगितले की, प्रभाग क्रमांक १० मधील हे मटण मार्केट अनेक वर्षांपूर्वी उभारण्यात आले असून, कालांतराने इमारतीची मोठ्या प्रमाणात झीज झाली आहे. छताला तडे गेले असून, अनेक ठिकाणी सिमेंटचे तुकडे गळत आहेत. लोखंडी सळ्या उघड्या पडल्या असून, भिंती कमकुवत झाल्या आहेत. पावसाळ्यात छत गळणे, पाणी साचणे आणि ओलाव्यामुळे इमारतीची अवस्था आणखी बिकट होत आहे. त्यामुळे दररोज येथे येणाऱ्या शेकडो ग्राहक, व्यापारी व कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यांनी पुढे सांगितले की, नागरिकांनी अनेक वेळा या समस्येबाबत तक्रारी केल्या आहेत. व्यापाऱ्यांनीही वारंवार प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र अद्यापही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.

कोणतीही दुर्घटना घडल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा ती टाळण्यासाठी आधीच निर्णय घेणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गुलाबराव मराठे यांनी मटण मार्केटमधील अस्वच्छतेचाही मुद्दा उपस्थित केला. सांडपाण्याची योग्य व्यवस्था नसल्याने परिसरात दुर्गंधी पसरते. नियमित स्वच्छता न झाल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे.

माशा, डास व भटक्या प्राण्यांचा वावर वाढल्याने संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण होत आहे. स्वच्छता आणि आरोग्याच्या दृष्टीनेही या मार्केटचे आधुनिकीकरण करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय पार्किंगची अपुरी व्यवस्था, वाहतुकीची कोंडी, ग्राहकांसाठी मूलभूत सुविधांचा अभाव आणि व्यापाऱ्यांसाठी अपुरेशी जागा यामुळे दिवसेंदिवस समस्या अधिक गंभीर होत असल्याचे त्यांनी नमूद केले. आधुनिक शहराच्या गरजेनुसार स्वच्छ, सुरक्षित आणि नियोजनबद्ध मटण मार्केट उभारल्यास व्यापाऱ्यांनाही चांगल्या सुविधा मिळतील आणि नागरिकांनाही दर्जेदार सेवा उपलब्ध होईल, असे त्यांनी सांगितले. महापालिका प्रशासनाने संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत तातडीने या इमारतीची तांत्रिक पाहणी करून ती धोकादायक असल्यास त्वरित स्थलांतराची प्रक्रिया सुरू करावी. तसेच नवीन ठिकाणी प्रशस्त, आधुनिक, स्वच्छता मानकांचे पालन करणारे, सांडपाण्याची योग्य व्यवस्था, शीतगृह, पिण्याचे पाणी, प्रकाश व्यवस्था, पार्किंग आणि कचरा व्यवस्थापनाच्या सुविधा असलेले अत्याधुनिक मटण मार्केट उभारण्याची मागणीही त्यांनी केली.

## निवृत्ती वेतनधारकांच्या समस्या सोडविण्यास प्रशासन कटिबद्ध!


जन सम्राट टाईम्स

**जळगाव| प्रतिनिधी:|** सेवानिवृत्त कर्मचारी हे जिल्हा परिषदेच्या परिवाराचा अविभाज्य भाग असून त्यांच्या समस्या संवेदनशीलतेने व प्राधान्याने सोडविण्यास जिल्हा परिषद प्रशासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांनी केले. तसेच सर्व विभागांनी सेवानिवृत्ती वेतनधारकांप्रती सहकार्याची आणि सहानुभूतीची भूमिका ठेवावी, असे निर्देशही त्यांनी दिले. जिल्हा परिषद मुख्यालयातील छत्रपती शाहू महाराज सभागृहात बुधवारी (दि. १५) आयोजित पेन्शन अदालत (तक्रार निवारण सभा) प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनोज चौधर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी विनोद चावरिया, शिक्षणाधिकारी निलेश पाटील, लेखाधिकारी उदय कुलकर्णी, विविध विभागांचे अधिकारी तसेच सेवानिवृत्ती वेतनधारक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. सभेदरम्यान सेवानिवृत्ती वेतनधारकांच्या पेन्शन, उपदान, गटविमा, प्रलंबित देयके तसेच इतर प्रशासकीय अडचणींबाबत संघटनेच्या प्रतिनिधींनी मते मांडली. उपस्थित करण्यात आलेल्या प्रत्येक मुद्द्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. करिश्मा नायर यांनी सांगितले की, सेवानिवृत्ती वेतनधारकांच्या सर्व प्रकरणांचा नियमांच्या अधीन राहून तातडीने निपटारा करण्यात येईल. तसेच किरकोळ कामांसाठी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना वारंवार जिल्हा परिषदेच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत, यासाठी कार्यपद्धती अधिक सुलभ, पारदर्शक आणि परिणामकारक करण्यात येईल. यावेळी सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेतर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांचा सत्कार करण्यात आला. पेन्शन अदालतीमुळे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून त्यांचे त्वरित निराकरण करण्यासाठी सकारात्मक संवाद साधला गेला.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स ब्रेक न्यूज ज

## जळगावात दोन आत्महत्यांच्या घटनांनी खळबळ!

### शिरसोली व विठ्ठलपेठ परिसरात हळहळ




जन सम्राट टाईम्स

**जळगाव। प्रतिनिधी :** जळगाव शहर आणि तालुक्यात दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये दोन जणांनी गळफास घेऊन जीवन संपवल्याच्या घटना समोर आल्या आहेत. या घटनांमुळे शिरसोली आणि विठ्ठलपेठ परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दोन्ही प्रकरणांची नोंद पोलिसांनी केली असून पुढील तपास सुरू आहे.

शिरसोली येथे २८ वर्षीय तरुणाची आत्महत्या

जळगाव तालुक्यातील शिरसोली प्र. न. येथे निवृत्ती गोकूळ बोबडे (वय २८) यांनी बुधवारी (१५ जुलै) सकाळी राहत्या घराच्या वरच्या मजल्यावर दोरीच्या साहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली.

निवृत्ती यांची आई त्यांना बोलविण्यासाठी वरच्या मजल्यावर गेली असता हा प्रकार तिच्या निदर्शनास आला. मुलाचा मृतदेह पाहून तिला मोठा धक्का बसला.निवृत्ती बोबडे हे एका खासगी कंपनीत नोकरीला होते. त्यांच्या पश्चात आई, वडील आणि दोन भाऊ असा परिवार आहे. या घटनेमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

विठ्ठलपेठेत ५६ वर्षीय व्यक्तीची आत्महत्या


जळगाव शहरातील विठ्ठलपेठ परिसरात कमलाकर बळीराम नेमाडे (वय ५६) यांनी १४ जुलै रोजी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. घटना लक्षात आल्यानंतर नातेवाईकांनी त्यांना तातडीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी शनिपेठ पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस हवालदार प्रमोद पाटील करीत आहेत.

दरम्यान, या दोन्ही घटनांमुळे संबंधित कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात शोककळा पसरली आहे. जळगाव शहर आणि तालुक्यात दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये दोन जणांनी गळफास घेऊन जीवन संपवल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

या घटनांमुळे शिरसोली आणि विठ्ठलपेठ परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दोन्ही प्रकरणांची नोंद पोलिसांनी केली असून पुढील तपास सुरू आहे. शिरसोली येथे २८ वर्षीय तरुणाची आत्महत्या जळगाव तालुक्यातील शिरसोली प्र. न. येथे निवृत्ती गोकूळ बोबडे (वय २८) यांनी बुधवारी (१५ जुलै) सकाळी राहत्या घराच्या वरच्या मजल्यावर दोरीच्या साहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली.

## डिझेलच्या टँकरला भीषण आग; ३५ हजार लिटर इंधनाने पेट घेतल्याने महामार्गावर खळबळ!

जन सम्राट टाईम्स



नेर| प्रतिनिधी : धुळे जिल्ह्यातील नेर गावाजवळ सुरत–नागपूर महामार्गावर शुक्रवारी पहाटे डिझेलने भरलेल्या टँकरला भीषण आग लागल्याने एकच खळबळ उडाली. सुमारे ३५ हजार लिटर डिझेल वाहून नेणारा टँकर काही क्षणांत आगीच्या भक्ष्यस्थानी सापडला. या घटनेमुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. मात्र, चालकाने प्रसंगावधान राखत वेळेत वाहनातून उडी मारल्याने मोठी जीवितहानी टळली. मिळालेल्या माहितीनुसार, गुजरातमधील जामनगर येथून आंध्र प्रदेशातील काकीनाडा येथे डिझेल घेऊन जाणारा टँकर नेर गावाजवळील मंजुश्री पेट्रोल पंपासमोर पहाटे साडेचारच्या सुमारास पोहोचला असता अचानक त्याला आग लागली. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले आणि संपूर्ण टँकर आगीच्या विळख्यात सापडला. आग लागल्याचे लक्षात येताच चालकाने प्रसंगावधान राखत तात्काळ वाहनातून उडी मारून स्वतःचा जीव वाचवला. त्यामुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली. मात्र, टँकर पूर्णपणे जळून खाक झाला असून त्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच धुळे महानगरपालिकेच्या अग्निशामक दलाचे जवान तातडीने घटनास्थळी दाखल झाले. डिझेलमुळे आग अधिक भडकण्याची शक्यता असल्याने अग्निशामक दलाने अत्यंत सावधगिरीने आणि शर्थीचे प्रयत्न करत आगीवर नियंत्रण मिळवले. जवानांच्या तत्परतेमुळे आग परिसरातील इतर वाहनांपर्यंत किंवा जवळील पेट्रोल पंपापर्यंत पोहोचण्यापासून रोखण्यात यश आले. आगीमुळे सुरत–नागपूर महामार्गावरील दोन्ही बाजूंची वाहतूक काही काळासाठी थांबविण्यात आली होती. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहतुकीचे नियोजन केले. आग पूर्णपणे आटोक्यात आल्यानंतर टप्प्याटप्प्याने वाहतूक पूर्ववत करण्यात आली. प्राथमिक अंदाजानुसार तांत्रिक बिघाडामुळे आग लागल्याची शक्यता व्यक्त केली जात असली, तरी नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. संबंधित यंत्रणांकडून या घटनेचा तपास सुरू असून टँकरला आग कशी लागली, याचा शोध घेतला जात आहे या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी टँकर पूर्णपणे जळाल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. पहाटेच्या शांत वातावरणात अचानक लागलेल्या या भीषण आगीमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. धुळे मनपा अग्निशामक दलाच्या तत्पर आणि धाडसी कामगिरीमुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

## गोलाणी मार्केटच्या 'सी' विंगमध्ये आरोग्य धोक्यात; तळमजल्यावर पाणी साचून दुर्गंधी!

### ओव्हरफ्लो होणाऱ्या पाण्याच्या टाकीमुळे ग्राहक त्रस्त

जन सम्राट टाईम्स



**जळगाव | प्रतिनिधी:** जळगाव शहरातील प्रमुख व्यापारी संकुल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोलाणी मार्केटच्या 'सी' विंगमध्ये गंभीर आरोग्य व स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. येथील तळमजल्यावर असलेल्या पाण्याच्या टाकीची दुरवस्था झाल्याने टाकी भरल्यानंतर मोठ्या प्रमाणात पाणी थेट खाली साचत आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधी, शेवाळे आणि डासांचा प्रादुर्भाव वाढला असून व्यापारी व ग्राहकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पाण्याची टाकी भरल्यानंतर अतिरिक्त पाणी योग्य निचऱ्याअभावी थेट तळमजल्यावरील मोकळ्या जागेत साचते.

हे पाणी अनेक दिवस साचून राहत असल्याने फरशी आणि भिंतींवर शेवाळे तयार झाले आहे. त्यामुळे नागरिकांचा पाय घसरून अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे. याहून गंभीर बाब म्हणजे साचलेल्या पाण्यात डेंग्यू, मलेरिया आणि चिकुनगुनियासारख्या आजारांना कारणीभूत ठरणाऱ्या डासांची पैदास वाढत असल्याची भीती व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही परिस्थिती अधिक धोकादायक ठरत असून, तातडीने उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे. गोलाणी मार्केटमध्ये दररोज हजारो ग्राहक खरेदीसाठी येतात. मात्र, 'सी' विंगमधील अस्वच्छता, दुर्गंधी आणि डासांच्या त्रासामुळे अनेक ग्राहक या भागात जाणे टाळत असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. परिणामी, व्यवसायावरही विपरीत परिणाम होत आहे. "महानगरपालिका नियमित कर आकारते, मात्र मूलभूत सुविधांच्या देखभालीकडे दुर्लक्ष का केले जाते?" असा सवाल व्यापाऱ्यांनी उपस्थित केला आहे. अनेक वेळा तोंडी तक्रारी करूनही कायमस्वरूपी तोडगा काढण्यात आलेला नसल्याचा आरोपही त्यांनी केला. व्यापाऱ्यांनी मनपा प्रशासनाकडे पाण्याच्या टाकीला ऑटोमॅटिक कट-ऑफ प्रणाली बसविणे, ओव्हरफ्लो पाईपची योग्य व्यवस्था करणे, साचलेले पाणी तातडीने उपसणे तसेच जंतुनाशक औषधांची फवारणी व ब्लिचिंग पावडर टाकण्याची मागणी केली आहे. एखाद्या साथीच्या आजाराचा उद्रेक होण्यापूर्वीच जळगाव महानगरपालिकेच्या स्वच्छता व पाणीपुरवठा विभागाने तातडीने लक्ष घालून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी व्यापारी, ग्राहक आणि नागरिकांकडून होत आहे.

## विठू माऊलीच्या चरणी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे साकडे; बळीराजा, वारकरी आणि जनतेच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना!

जन सम्राट टाईम्स

**पंढरपूर / जळगाव। प्रतिनिधी :** राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी आषाढी वारीनिमित्त पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात जाऊन विठू माऊलीचे भक्तिभावाने दर्शन घेतले. दरवर्षीच्या परंपरेनुसार यंदाही त्यांनी विठ्ठलाच्या चरणी नतमस्तक होत राज्यातील शेतकरी, वारकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. दर्शनानंतर विठ्ठलाच्या चरणी साकडे घालताना पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले, "महाराष्ट्रात वेळेवर आणि भरघोस पाऊस पडू दे. बळीराजाच्या कष्टाला यश लाभू दे. प्रत्येक कुटुंब सुखी आणि समृद्ध राहो.

वारकरी संप्रदायाची अखंड सेवा सुरू राहो आणि संपूर्ण महाराष्ट्रावर विठू माऊलीची कृपादृष्टी कायम राहो," अशी भावपूर्ण प्रार्थना त्यांनी केली. यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी सांगितले की, पंढरपूरची आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या संतपरंपरेची, भक्तीची आणि समतेची ओळख आहे. विठ्ठलाच्या दर्शनाने समाजसेवेची नवी ऊर्जा मिळते आणि जनतेसाठी अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळते, असे त्यांनी नमूद केले. मंदिर परिसरात त्यांनी वारकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. वारकरी संप्रदायाच्या सेवेसाठी राज्य शासन कटिबद्ध असून भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच राज्यातील सर्व नागरिकांना आषाढी वारीच्या शुभेच्छाही दिल्या. यावेळी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचे ट्रस्टी संभाजी शिंदे यांच्या हस्ते पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

## २२ जुलै ते २ ऑगस्टदरम्यान 'शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर!

### एकादशी व वारीच्या पार्श्वभूमीवर कालावधीत वाढ

जन सम्राट टाईम्स

**जळगाव| प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी जळगाव जिल्ह्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानाच्या नियोजनाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी माहिती दिली. महसूल विभागाच्या शासन निर्णयानुसार या अभियानाच्या कालावधीत वाढ करण्यात आली आहे.

यापूर्वी हे शिबीर २२, २५ आणि २६ जुलै २०२६ या तीन दिवसांपैकी एका दिवशी आयोजित करण्याचे नियोजन होते. मात्र, २५ जुलै रोजी आषाढी एकादशी असल्याने नागरिक व लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने पंढरपूर वारीत सहभागी होणार आहेत. त्यामुळे आता २२ जुलै ते २ ऑगस्ट २०२६ या कालावधीत प्रत्येक विधानसभा मतदारसंघात कोणत्याही एका दिवशी शिबिराचे आयोजन करता येणार आहे.

प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील शिबिरासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. प्रत्येक मतदारसंघात किमान ५ हजार कुटुंबांना, तर राज्यभरात १० लाख कुटुंबांना विविध योजनांचा लाभ देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. एकाच छताखाली विविध शासकीय सेवांचा लाभ समाधान शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिला जाणार आहे. यामध्ये महिलांना शेतकरी दर्जाचे प्रमाणपत्र वाटप, गावठाण जागेचे वाटप, नागरिकांना स्वामित्व सनद देणे, 'मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना', शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करणे तसेच महसूल विभागाची 'जिवंत सातबारा' मोहीम राबविण्यात येणार आहे. याशिवाय निवासी व व्यावसायिक जमिनी फ्री-होल्ड करण्यासाठी 'विशेष अभय योजना-२०२५' ला मुदतवाढ, शेतजमिनीच्या कौटुंबिक वाटपपत्रावरील नोंदणी शुल्क पूर्णपणे माफ करणे, कुंभार समाजातील नागरिकांना पारंपरिक व्यवसायासाठी सवलती, 'राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना' तसेच वंचित व अनाथ घटकांना योजनांचा लाभ मिळवून देण्यावर भर दिला जाणार आहे. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अपर जिल्हाधिकारी श्रीमंत हारकर यांच्या अध्यक्षतेखाली महसूल, कृषी, जिल्हा परिषद आणि लीड बँकेच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेण्यात आली आहे. संबंधित विभागांना पात्र लाभार्थ्यांची तालुकानिहाय व योजनानिहाय माहिती सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## प्रणव येळमकर यांचा 'सुबोध बालकाव्य गीत' संग्रह नागपुरात प्रकाशित

### पाचव्या आंतरराष्ट्रीय बहुभाषिक साहित्य संमेलनात प्रकाशन; डॉ. रविंद्र शोभणे यांच्या हस्ते सन्मान

जन सम्राट टाईम्स

**भडगाव| प्रतिनिधी** भडगाव तालुक्यातील मूळ रहिवासी असलेले १२ वर्षीय बालकवी प्रणव येळमकर यांच्या 'सुबोध बालकाव्य गीत' या काव्यसंग्रहाचे नागपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या पाचव्या आंतरराष्ट्रीय बहुभाषिक साहित्य संमेलनात प्रकाशन करण्यात आले.

यावेळी त्यांचा सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. हा काव्यसंग्रह डॉ. सागर गुडमेवार यांच्या के. ए. समूह इंटरनॅशनल पब्लिकेशन, पुणे यांच्या वतीने प्रकाशित करण्यात आला. संमेलनात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रविंद्र शोभणे यांच्या हस्ते प्रणव येळमकर यांचा सत्कार करण्यात आला. विविध राज्ये आणि देशांतून सहभागी झालेल्या साहित्यिकांनी त्यांच्या प्रतिभेचे विशेष कौतुक केले. प्रणव येळमकर हे श्री दत्त मंदिर, भातखंडे बुद्रूक (ता. भडगाव, जि. जळगाव) येथील मूळ रहिवासी असून सध्या अध्यात्मिक व शालेय शिक्षणासाठी एरंडोल तालुक्यातील जवखेडा सिम येथील साधनानंद महानुभाव आश्रमात वास्तव्यास आहेत. तेथे श्रीमद् भगवद्गीता व ब्रह्मविद्येचे



शिक्षण घेत असताना त्यांच्यातील काव्यप्रतिभेला वाव मिळाला. गुरुवर्य प.पू. महात्मा श्री. भूषणमुनी बाबा अंकुळनेरकर यांनी त्यांच्या काव्यगुणांची दखल घेत त्यांना मार्गदर्शन व प्रेरणा दिली. त्यांच्या प्रेरणेतून १०२ कवितांचा 'सुबोध बालकाव्य गीत' हा संग्रह साकार झाला. काव्यसंग्रह प्रकाशित झाल्यानंतर जवखेडा सिम येथील आश्रम तसेच भातखंडे येथे प्रणव येळमकर यांचा सत्कार करण्यात आला. पुस्तकाला शाळकरी विद्यार्थी, पालक आणि साहित्यप्रेमी यांच्याकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून त्याची मागणी दिवसेंदिवस वाढत असल्याचे सांगण्यात आले.

**प्रणव येळमकर यांचा सत्कार**

संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रविंद्र शोभणे यांच्या हस्ते प्रणव येळमकर यांचा सत्कार करण्यात आला. विविध राज्ये आणि देशांतून सहभागी झालेल्या साहित्यिकांनी त्यांच्या प्रतिभेचे विशेष कौतुक केले. प्रणव येळमकर हे श्री दत्त मंदिर, भातखंडे बुद्रूक (ता. भडगाव, जि. जळगाव) येथील मूळ रहिवासी असून सध्या अध्यात्मिक व शालेय शिक्षणासाठी एरंडोल तालुक्यातील जवखेडा सिम येथील साधनानंद महानुभाव आश्रमात वास्तव्यास आहेत. तेथे श्रीमद् भगवद्गीता व ब्रह्मविद्येचे शिक्षण घेत असताना त्यांच्यातील काव्यप्रतिभेला वाव मिळाला. गुरुवर्य प.पू. महात्मा श्री. भूषणमुनी बाबा अंकुळनेरकर यांनी त्यांच्या काव्यगुणांची दखल घेत त्यांना मार्गदर्शन व प्रेरणा दिली. त्यांच्या प्रेरणेतून १०२ कवितांचा 'सुबोध बालकाव्य गीत' हा संग्रह साकार झाला. काव्यसंग्रह प्रकाशित झाल्यानंतर जवखेडा सिम येथील आश्रम तसेच भातखंडे येथे प्रणव येळमकर यांचा सत्कार करण्यात आला.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306